ग्राम पंचायत सदस्यत्वातील राखीव पदे भरणे

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग,

परिपत्रक क्रमांक ग्रापनि १०८८/प्र.क्र.९०८/२१ अ

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक= २९ नोव्हेंबर १९८९

शासन परिपत्रक:- मुंबई ग्राम पंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम १४[के] च्या तरतुदीनुसार या अधिनियमातील इतर तरतुदीन्वये विहित केलेल्या अनर्हतेमुळे अनर्ह ठरत असलेली परंतु अनर्हतेचा कालावधी संपुष्टात न आलेली व्यक्ती ग्राम पंचायतीची सदस्य होऊ शकत नाही किंवा त्या पदावर राहू शकत नाही. या अधिनियमाखाली तयार केलेल्या मुंबई ग्राम पंचायत निवडणूक नियम, १९५९ च्या नियम ५ च्या तरतुदीनुसार ग्राम पंचायत सदस्यत्वात स्त्रिया, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी राखीव ठेवलेल्या पदांवर अनुक्रमे स्त्रिया, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींमध्ये मोडणाऱ्या व्यक्तीच त्या पदावर निवडून येण्यास पात्र आहेत. परंतु त्या पदांवर इतर व्यक्ती निवडून आल्यास त्या अनर्ह करतात किंवा कसे अशी विचारणा शासनाकडे करण्यात आली होती या संबंधात असे स्पष्ट करण्यात येते की ग्राम पंचायत सदस्यत्वात स्त्रिया, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी राखीव ठेवलेल्या पदांवर अनुक्रमे स्त्रिया, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीं-व्यतिरिक्त इतर व्यक्ती निवडून आल्यास अशा व्यक्ती ग्राम पंचायत सदस्यत्वासाठी अनर्ह ठरतात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ज. स. घाणेकर]
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी [जिल्हाधिकारी, मुंबई व उपनगरे वगळून],
ग्राम विकास विभाग/का.क्र. २१ व २२
ग्राम विकास विभाग/का.क्र. २१ अ निवड नस्ती .

ग्रामपंचायत सदस्यत्वातील राखीव पदे भरणे.

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग,
परिपत्रक क्रमांक ग्रापनि.१०८८-प्र.क्र.१०८-२१-अ.
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ नोव्हेंबर,१९८९.

शासन परिपत्रक.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम,१९५८ मधील कलम १४(के) च्या तरतुदीनुसार या अधिनियमातील इतर तरतुदीन्वये विहित केलेल्या अर्हतेशिवाय अर्ह ठरत असलेली परंतु अर्हतेचा कालावधी संपुष्टात न आलेली व्यक्ती ग्राम पंचायतीची सदस्य होऊन शकत नाही. किंवा त्या पदावर राहू शकत नाही. या अधिनियमाखाली तयार केलेल्या मुंबई ग्राम पंचायत निवडणूक नियम, १९५९ च्या नियम ५ च्या तरतुदीनुसार ग्राम पंचायत सदस्यत्वात रिक्त्या, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी राखीव ठेवलेल्या पदांवर अनुक्रमे रिक्त्या, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींमध्ये मोडणाऱ्या व्यक्तीच त्या पदावर निवडून येण्यास पात्र आहेत. परंतु त्या पदांवर इतर व्यक्ती निवडून आल्यास त्या अर्ह करतात किंवा कसे अशी विचारणा शासनाकडे करण्यात आली होती या संबंधात असे स्पष्ट करण्यात येते की, ग्रामपंचायत सदस्यत्वात रिक्त्या, अनुसूचित जाती व अनुसूचित ~~जमाती व्यतिरिक्त इतर व्यक्ती निवडून आल्यास अशा व्यक्ती ग्रामपंचायत सदस्यत्वासाठी अर्ह ठरतात.~~ जमातींसाठी राखीव ठेवलेल्या पदांवरअनुक्रमे रिक्त्या, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व्यतिरिक्त इतर व्यक्ती निवडून आल्यास अशा व्यक्ती ग्राम पंचायत सदस्यत्वासाठी अर्ह ठरतात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

सही : व.सं.घाणेकर
कार्यासन अधिकारी महाराष्ट्र शासन.

सर्व जिल्हाधिकारी.

०००००००

क्रमांक. सशा.पंचा.कीर्या.१.के.क्र.११४९. जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,
रत्नागिरी, दि. १७-१२-१९८९.

प्रत : तहसीलदार (सर्व) यांचेकडे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाही साठी रवाना.

मूळप्रत निवासी उप-जिल्हाधिकारी,
यांचे सहीची

जिल्हाधिकारी रत्नागिरी करिता.